MHST090002252021

## नि.दि.दा.क्र. १९/२०२१ मधील निशाणी क्र. ५ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ याने दाव्याच्या अंतिम निकालापावेतो तबदील करु नये अथवा त्यावर ति–हाईत इसमाचा हक्क प्रस्तापित करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ नुसार दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना समन्सची बजावणी होवून देखील ते न्यायालयात हजर झाले नाहीत व सदर दावा त्यांच्या विरुद्ध एकतर्फा चालविण्यात येत आहे. वादी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. आर.जी.कासार यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

२. वादातीत कथने, सादर करण्यात आलेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन माझे विचारार्थ खालील वादमुद्दे निष्पन्न झाले. त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहेः

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे वतीने सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | होकारार्थी |
| २. | सोयीचा समतोल वादीच्या वतीने आहे का ? | होकारार्थी |
| ३. | प्रस्तूतचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## का र ण मि मां सा

## मुद्दा क्र. १ ते ४ करिता

३. प्रतिवादी क्र.१ हे वादीचे वडील, प्रतिवादी क्र.२ व ३ हे चुलते, प्रतिवादी क्र.४ ही वादीची आजी व प्रतिवादी क्र.५ ही आत्त्या आहे. तसेच मयत कल्पना ही वादीची आत्त्या असून प्रतिवादी क्र. ६ व ७ ही तिची मुले आहेत. वादीचे असे कथन आहे की त्याचा दावा मिळकतीत अविभक्त हिस्सा आहे आणि सदर मिळकती या वडीलोपार्जित आहेत. वादीला प्रकरण सकृत दर्शनी सिद्ध करण्याकरीता दावा मिळकती या वडीलोपार्जित आहेत व त्यात त्याचा अविभक्त हिस्सा आहे हे सिद्ध करणे आवश्यक आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की दावा मिळकती या प्रतिवादीच्या आजतागायत सामाईक वहिवाटीत आहेत. तसेच वादीने तुर्तातुर्त मनाई हुकूम केवळ प्रतिवादी क्र. १ विरुद्ध देण्याची विनंती केली आहे. सदर सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रथम दर्शनी असे दिसून येते की दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जित मिळकती असून वादीचा त्यात अविभक्त हिस्सा आहे. तसेच, प्रतिवादींनी हजर होवून सदर बाब फेटाळली नसल्याने वादीची तोंडी कथने विश्वासार्ह वाटतात.

४. तसेच वादीचे असे कथन आहे की त्याने दावा मिळकतीतील त्याचा अविभक्त हिस्सा प्रतिवादी क्र. १ यांना वाटून मागितला असता त्यांनी त्याचा हिस्सा वाटून देण्यास नकार दिला. तसेच प्रतिवादी क्र. १ वादीस म्हणाले की सदर जमीनी माझ्या नावावर आहेत, त्याचे मी काहीही करीन, तुझा त्यात काडीमात्र संबंध नाही,

तुला काय करायचे ते तु कर यावरुन प्रथम दर्शनी असे दिसून येते की तुर्तातुर्त मनाई हुकूम नाकारल्यास दावा मिळकत तबदील होण्याची शक्यता आहे व त्याने वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की सकृत दर्शनी प्रकरण वादीच्या बाजूने आहे. तसेच न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजूने आहे. तसेच जर तुर्तातुर्त मनाई हुकूम नामंजूर केल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब, मुद मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे. तसेच मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ने दाव्याचा निकाल लागेपावेतो दावा मिळकती तबदील करु नये अथवा त्यावर ति–हाईत इसमाचा हक्क प्रस्तापित करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा आदेश पारित करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2023.08.09 17:13:13 +0530

स्थळ : कोरेगाव ( ए.ए.पाचरणे )

दिनांक :०९/०८/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.